## सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनाः

भारतीय राज्य घटनेच्या ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी करावयाच्या कामामध्ये दारिद्रय निमूर्लन कार्यक्रमाचा अंतर्भाव केलेला आहे. त्यामुळे नागरी दारिद्रय निर्मुलन हे स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्वाचे काम आहे. यासाठी केंद्र शासनाने सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना दि. १ डिसेंबर, १९९७ पासून शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबांकरीता सुरु केली आहे.

केंद्र शासनाने निश्चित केलेल्या शहरी दारिद्रय रेषेखालील जीवनमान असणा-या व शहरी भागात रहाणा-या दारिद्रय रेषेखालील सर्वेक्षण झाल्यानंतर पात्र ठरणा-या गरीब व्यक्ती या योजनेच्या लाभार्थी असून नियोजन आयोगाने कुटुंबाचे दरमहा उत्पन्न रु. ५९१.७५ पेक्षा कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना योजनेचे लाभ दिले आहेत. या योजने अंतर्गत खालील घटक योजना आहेत.

मा. नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे कार्यालयाकडून दि. २६/११/२०१० रोजी ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील दारिद्रय रेषेखालील लाभार्थींची यादी प्राप्त झाली आहे. सदर यादी वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवून शासननिर्णयानुसार त्यावर सुचना व हरकती मागविण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे. शासनाच्या नगरपरिषद प्रशासन संचालनालय क्र. सुजयो/उदिद्ष्ट धोरण/२०१०/का. १६ दि. २२ जुलै २०१० अन्वये ठाणे महानगरपालिकेस भौतिक /आर्थिक उदिद्ष्ट देण्यात आले आहे. त्यान्वये सदरच्या योजनेची अंमलबजावणी महापालिकेमार्फत सुरू आहे. योजनेची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे.

### १ ) स्वयंरोजगार : (USEP)

नागरी भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांना छोटे उद्योग उत्पादने, पारंपारिक सेवा, व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या योजनेमध्ये लाभार्थींना बँकांकडून रू. २,००,०००/- पर्यंत कर्ज देण्यात येते. प्रकल्प किंमतीच्या २५% किंवा रू. ५०,०००/- पर्यंत अनुदान देण्यात येते लाभार्थीने प्रकल्प किंमतीच्या ५% रक्कम बीज भांडवल म्हणून गुंतवायची असते. कर्जाची परतफेड ३ ते ७ वर्षेपर्यंत करायची असते.

### २ ) स्वयंसहाय्यता /बचत गट (T&C)

वस्तीत राहणा-या ५ दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील प्रत्येकी एक महिला घेऊन गट बनविण्यात येतो. स्वयंसहाय्यता गटाचे रुपांतर बचत गटात व्हावे यासाठी गटातील महिलांना काटकसरीने बचत करणे, कर्ज घेणे, परतफेड करणे या आर्थिक व्यवहारांची माहिती स्वयंसेविकांमार्फत दिली जाते. गटातील महिला दर महिन्याला ठराविक रक्कम बचत करतात. ज्या बचत गटाने यशस्वीरित्या सहा महिने पुर्ण केले असेल त्यांना शासनातर्फे प्रति गट १०,०००/- फिरते भांडवल मिळते.

### ३ ) महिला व बालके विकास गट (UWSP)

महिला व बालके विकास गटास डवाका गट म्हणतात. सक्षम बचत गट यशस्वी होऊन सामुहिक व्यवसाय करायचे ठरवतो तेव्हा तो या गटाचा लाभ घेतो. या गटांना व्यवसाय करण्यासाठी राष्ट्रीयकृत आणि शेडयूल बँकाकडून कर्ज मिळते. प्रत्येक गटाला ९,००,०००/- पर्यंतचा उद्योग सुरू करता येतो. प्रकल्प किंमतीच्या ३५% किंवा ३,००,०००/- पर्यंत अनुदान मिळते. व्यवसाय सुरू करण्याचे आणि चालविण्याचे प्रशिक्षण शासनातर्फे देण्यात येते. या गटांच्या उत्पादित मालाच्या विक्रीसाठी आधर केंद्राची सोय आहे. मनपा तर्फे या गटांना दैनंदिन सेवांची कामे प्राधान्याने देण्याची तरतूद केली आहे.

### ४ ) सामाजिक संरचना (UCDN)

दारिद्रय रेषेखालील जास्तीत जास्त दोन हजार कुटुंबांची मिळून एका वस्तीमध्ये समाज विकास संस्था बनविण्यात येते. या संस्थेचे नियंत्रण सस्तीतील लाभार्थीच करतात. या संस्था धर्मादाय आयुक्तांकडे रजिस्टर होतात. संस्थेतर्फे लाभार्थी निवडून त्यांचे अर्ज भरून घेतले जातात. लाभार्थींना योजने अंतर्गत मिळालेल्या

कर्जाच्या परतफेडीवर नियंत्रण ठेवले जाते. समाज विकास संस्थेतर्फे योजनेतील विविध घटकांची माहिती वस्तीतील सर्व लाभार्थ्यांना देण्यात येते. तसेच इतर शासकिय योजनांची माहिती सुध्दा करून दिली जाते. त्याचप्रमाणे लाभार्थ्यांचे व्यक्तीगत आरोग्य, शिक्षण, सामाजिक न्याय, कायदेविषयक माहिती, प्रौढ साक्षरता, रोजगार, निगडीत प्रबोधन कार्यक्रम घेता येतात. महिलांसाठी विविध सामाजिक कार्यक्रम राबिविता येतात. वस्तीतील स्थानिक साधने आणि गरजा यांचा तपशील नोंदवून त्यांची शहरी रोजगार कार्यक्रमाशी सांगड घातली जाते.

**५ ) प्रशिक्षण (STEP-UP)**

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत प्रशिक्षण या घटक योजने नुसार दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील इच्छुक व्यक्तीस त्यांनी निवडलेल्या व्यवसाया बाबत त्यांचेमध्ये कौशल्य वृध्दी होऊन बेरोजगारी दुर होण्याचे दृष्टीने प्रशिक्षण देण्यात येते. सदर प्रशिक्षणाचा संपूर्ण खर्च शासनाकडून दिला जातो. ही योजना दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील गरीबांना योग्य प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधी वाढवते.